बीड । रविवार
२७.०४.२०२५
वर्षे : ५ अंक : २७
किंमत : ३ रू. पाने : ४

दैनिक ● www.marathwadapatra.com

# मराठवाडा पत्र

■ संपादक : दत्तात्रय सखाराम नरनाळे ■




dailymarathwadapatra2021@gmail.com RNI:Reg.NO.MAH/MAR/2021/80074 Post:Reg.No.L/226/RNP/Renewal/2025-2027 Mob:9822152955 



## परभणीत अजित पवारांचा ताफा अडवला, चुन्याच्या डब्या फेकत केला निषेध !

**परभणी । प्रतिनिधी**

एक रुपयात पिक विमा योजनेला शेतकऱ्यांनी चुना लावला, असा आरोप करणाऱ्या उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या परभणी दौऱ्यात किसान सभा आणि युवक काँग्रेसच्या पदाधिकाऱ्यांनी गोंधळ घातला. परभणी जिल्हाधिकारी कार्यालयात अजित पवार यांच्या वाहनांचा ताफा येत असताना अचानक आंदोलनकर्त्यांनी घोषणाबाजी सुरू केली. सोबत आणलेल्या चून्याच्या डब्या अजित पवारांच्या वाहनांच्या ताब्यावर फेकत विधानाचा निषेध केला.

युवक काँग्रेसचे पदाधिकारी तसेच किसान सभेच्या कार्यकर्त्यांनी अचानक केलेल्या या आंदोलनामुळे पोलिसांची तारांबळ उडाली. आंदोलकांना ताब्यात घेत पोलिसांनी अजित पवारांच्या ताफ्याला मार्ग करून





दिला. या प्रकाराने जिल्हाधिकारी कार्यालयात बराच वेळ गोंधळाचे वातावरण होते. दरम्यान अजित पवारांच्या वाहनांचा ताफा अडवण्याचा प्रयत्न करणाऱ्या कार्यकर्त्यांना नवा मोंढा पोलिसांनी ताब्यात घेतले आहे.

विकास कामांचा आढावा घेण्यासाठी अजित पवार आज परभणी जिल्हा दौऱ्यावर आहेत. जिल्हाधिकारी कार्यालयातील बैठकीनंतर ते महापालिकेचाही आढावा घेणार आहेत. दुपारी बारा वाजता जिल्हाधिकारी कार्यालयाच्या प्रवेशद्वारावर अजित पवारांच्या वाहनांचा ताफा येताच जिल्हा युवक काँग्रेसचे अध्यक्ष तसेच किसान सभेचे पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी जोरदार घोषणाबाजी केली.

अजित पवार यांनी एक रुपयात पिक विमा योजनेला शेतकऱ्यांनी चुना लावला, असे

▶▶ उर्वरित पान २ वर

## पाच लाखाच्या मुद्देमालासह बीड पोलिसांनी पकडले आठ चंदनचोर

**बीड । प्रतिनिधी**

बीड पोलीसांना गोपनीय माहीती शमळाली होती की, सौताडा शिवारातील जामखेड रोड, वांजारा फाटा मागेकाही इसम हेचांदनाच्या झाडांची अवैध वाहतुक करणार आहे.त्यावरुन मा. पोलीस अधीक्षक श्री. नवनीत काँवत (भा.पो.से.) यांनी सपोशन मधुसुदन घुगेव त्यांच्या पथकाला आदेश करुन सदर शिकाणी छापा टाकण्याचेआदेीत के ले. त्यावरुन सपोशन मधुसुदन घुगेनेमणुक शनयांत्रण कक्ष यांनी त्यांचे पथक व दोन पांच यांचेसह सदर ठिकाणी सापळा रचला असता १४:१५ वाजेच्या सुमारास काही इसम सशंयास्पद स्थीतीत येतांना दिसले. त्यांना थांबवून पांचांसमक्ष विचारपुस करुन त्यांची झडती घेतली असता त्यांचेकडे चादनाच्या झाडाचा



▶▶ उर्वरित पान २ वर

## गाईंना गुंगीचे औषध देऊन तस्करी करण्याचा प्रयत्न फसला; चोरट्यांवर तात्काळ कारवाई करा: पंकजा मुंडेंचा

**बीड । प्रतिनिधी**



गाईंना गुंगीच औषध देऊन त्यांना पळवण्याचा प्रयत्न करणाऱ्यांवर आता कारवाई करण्यात येणार आहे. राज्याच्या पशुसंवर्धन मंत्री पंकजा मुंडे यांनी बीड पोलिस प्रशासनाला सूचना दिल्या आहेत. या आरोपींना तात्काळ अटक करून कारवाई करण्याच्या सूचना पंकजा मुंडे यांनी दिल्या. परळीतील स्नेहनगर भागात गुंगीचे औषध देऊन गाईंना चोरण्याचा प्रयत्न काही चोरट्यांनी केला होता.

शहरातील स्नेहनगर भागात शुक्रवारी रात्री गायींना खाण्याच्या पदार्थांमधून औषध देण्याचा संतापजनक प्रकार घडला. गायींना बेशुद्ध करून त्यांची तस्करी करण्याचा अज्ञात चोरट्यांचा प्रयत्न होता असा संशय स्थानिक रहिवाशांना आला. त्यांनी सतर्कता दाखवून हा प्रयत्न हाणून पाडला. राज्याच्या पशुसंवर्धन मंत्री पंकजा मुंडे यांना हा प्रकार समजताच त्यांनी तातडीने पोलिस अधीक्षक आणि स्थानिक पोलिस निरीक्षक यांच्याशी संपर्क साधला. या प्रकारामागे जे कोणी असतील त्यांना तातडीने अटक करून कडक कारवाई करण्याच्या सूचना दिल्या. गुंगीचे औषध मिश्रित पदार्थ खाल्याने ज्या गायी बाधित झाल्या होत्या त्यांच्यावर त्वरेने उपचार करण्याच्या सूचनाही पंकजा मुंडे यांनी दिल्या होत्या. त्यानंतर पशुसंवर्धन अधिकाऱ्यांनी उपचार करून चार गायींना धोक्यातून बाहेर काढले. एका गायीवर अद्याप उपचार सुरू आहेत.

## कैद्यांना भेटू देणे आले अंगलट ?

**बीड । प्रतिनिधी**

येथील कारागृहाचा पदभार तात्पुरत्या स्वरूपात आलेल्या एका वरिष्ठ तुरुंग अधिकारी आणि महिला शिपाईचे निलंबन करण्यात आले असल्याची चर्चा आहे. . नातलग अथवा रक्ताच्या नात्यापेक्षा इतर लोकांना कैद्यांना भेटू देणे व कारागृहात इतर काही त्रुटी आढळून आल्याने या दोघांचे निलंबन झाल्याचे बोलले जाते, मात्र याला याबाबत अधिकृत दुजोरा मिळालेला नाही. एक ते दीड महिन्यांपूर्वी बीडच्या कारागृहाचा पदभार एका वरिष्ठ तुरुंग अधिकाऱ्यांकडे काही दिवसांसाठी सोपविण्यात आला होता.या कालावधीमध्ये कारागृह महासंचालक कार्यालयातील एक

▶▶ उर्वरित पान २ वर

## अखेर कला केंद्र प्रकरण भोवले रत्नाकर शिंदे यांची जिल्हाप्रमुख पदावरुन हकालपट्टी

**बीड । प्रतिनिधी**



केज तालुक्यातील महालक्ष्मी कला केंद्र येथे पोलिसांनी दोन दिवसापूर्वी छापा मारला होता यावेळी ते फक्त नावाला कला केंद्र होते परंतु तेथे वेश्या व्यवसाय चालू असल्याचे उघडकीस आले. तेथून काही महिलांची सुटका देखील करण्यात आली या सर्व प्रकरणात शिवसेना ठाकरे गटाचे जिल्हाप्रमुख रत्नाकर शिंदे यांचे नाव समोर आले यानंतर सर्व प्रसार माध्यमांमध्ये बातमी पसरली असता शिवसेना पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांनी रत्नाकर शिंदे यांची तडकाफडकी जिल्हाप्रमुख पदावरून हकालपट्टी केली आहे.

यानंतर पूर्ण बीड जिल्ह्यात सर्वत्र चर्चेला उधाण आले आहे कि आता उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे जिल्हाप्रमुख पद कोणाकडे जाते, त्यामुळे पुन्हा एकदा उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे जिल्हाप्रमुख म्हणून स्वच्छ प्रतिमा असलेले परमेश्वर सातपुते यांच्या कडे जबाबदारी दिली जाऊ शकते अशी सर्वत्र बीड जिल्हाभरात चर्चा होत आहे.

## स्वच्छता करायला गेलेल्या रस्त्यावरच पडला सफाई कर्मचाऱ्यांच्या रक्ताचा सडा





**दिल्ली**

दिल्ली-मुंबई एक्सप्रेसवेवर आज सकाळी भीषण अपघात झाला. हरियाणातील नुहमध्ये इब्राहिमबास गावाजवळ एका भरधाव वेगाने येणाऱ्या पिक-अपने रस्त्याची सफाई करणाऱ्या कर्मचाऱ्यांना धडक दिली. या अपघातात सहा कर्मचाऱ्यांचा जागीच मृत्यू झाला. तर पाच कर्मचारी गंभीर जखमी झाले आहेत. सकाळी १० वाजण्याच्या सुमारास हा अपघात झाला. दिल्ली-मुंबई एक्सप्रेसवेवर आज सकाळी स्वच्छता कर्मचाऱ्यांवर साफसफाईचे काम करत असताना काळाने घाला घातला. एकुण १० कर्मचारी होते, अचानक एक वेगवान पिकअप आली आणि त्यांना जोरदार धडकली. ही टक्कर इतकी भीषण होती की सहा कर्मचाऱ्यांचा जागीच मृत्यू झाला. तर जखमी झालेल्या पाच कर्मचाऱ्यांना तातडीने जवळच्या रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे, त्यांची प्रकृती चिंताजनक आहे.

अपघातानंतर घटनास्थळी आरडाओरडा सुरू झाली. अपघाताची भीषणता इतकी होती की आजूबाजूचे लोकही थक्क झाले होते. मृतदेहांचे तुकडे तुकडे झाले होते, घटनास्थळावरील संपूर्ण रस्ता रक्ताने माखला होता. स्थानिक लोकांनी तात्काळ पोलिसांना कळवले आणि जखमींना रुग्णालयात नेण्यास मदत केली. काही वेळातच रस्त्यावर मोठी गर्दी जमली. रुग्णवाहिका, रस्ता सुरक्षा एजन्सीची वाहने आणि पोलिस पथके घटनास्थळी पोहोचली. ▶▶ उर्वरित पान २ वर

## बीड पंचायत समितीत लोकप्रतिनिधी आणि आधिका-यांच्या वादात शेतकऱ्यांची अडवणूक

### जिल्ह्यात ७३५७ कामांवर ८८,७२४ मजुर असताना बीड तालुक्यात केवळ ५० कामांवर २१७ मजुर ; सोमवारी लक्ष्यवेधी आंदोलन : डॉ.गणेश ढवळे

**बीड । प्रतिनिधी**

बीड जिल्ह्यातील रोजगार हमी योजना कायम वादग्रस्त असताना सध्या ४३ अंशावर तापमानात तब्बल ८८ हजार मजुर रोजगार हमीवर काम करत असल्याची शासन दरबारी नोंद असुन जिल्ह्यात सर्वत्र मोठ्या प्रमाणावर कामे सुरू असताना बीड पंचायत समिती मध्ये मात्र लोकप्रतिनिधी आणि पंचायत समिती अधिकारी यांच्या अंतर्गत वादामुळे शेतकऱ्यांची अडवणूक होत असुन रोहयोची अनेक कामे खोळंबून पडली आहेत. घरकुल,गायगोठा,पाणंद रस्ते ,विहिरी आदिच्या कामांची मागणी, मंजुरी आणि मस्टर बंद पडल्याने शेतकरी अडचणीत सापडला असुन लोकप्रतिनिधी आणि गटविकास अधिकारी यांच्या अंतर्गत वादामुळे गटविकास अधिकारी कार्यालयात हजर राहत नसल्याचे अडवणूक होत असलेल्या शेतकऱ्यांनी सांगितले.यामुळे गटविकास अधिकारी यांनी कार्यालयीन



### अशी आहेत कामे सुरु...

| तालुका | काम | मजुर |
|---|---|---|
| केज | १५२२ | १६७३७ |
| गेवराई. | १०५६ | १५९३५ |
| पाटोदा. | ८९८ | ११,३८५ |
| आष्टी. | ७५१ | ४,५८० |
| परळी. | ६६५ | ११,२२१ |
| अंबेजोगाई | ५८२ | ७,०७६ |
| शिरूर. | ५४४ | ७,६२० |
| माजलगाव. | ४९७ | ३,७९८ |
| वडवणी. | ४६३ | ५,३७२ |
| धारूर. | ३२१ | ४,७८६ |
| बीड. | ५० | २१७ |
| एकुण. | ७३५७ | ८८,७२४ |

वेळेत कार्यालयात हजर राहून शेतकऱ्यांची कामे मार्गी लावावीत यासाठी सामाजिक कार्यकर्ते डॉ. गणेश ढवळे लिंबागणेशकर यांच्या नेतृत्वाखाली दि. २८ सोमवार रोजी

▶▶ उर्वरित पान २ वर

## गोदावरी पात्रातील अवैध वाळू वाहतुकीवर अंबड महसूल पथकाची पहाटे धाड; 6 हायवा जप्त

**वडीगोद्री । प्रतिनिधी**

अंबड तालुक्यातील आपेगाव गोदावरी नदीपात्रातून अवैध वाळू वाहतूक करणारे सहा हायवा तहसीलदार विजय चव्हाण यांनी शनिवारी पहाटे ३ वाजता पकडले. गोदावरी पात्रालगत केलेल्या या कारवाईत एकूण ३ कोटी ५७ लाख ३६ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

अंबड तहसीलदार विजय चव्हाण यांना अवैध वाळू वाहतुकीची गुप्त वार्ता मिळाली. त्यानंतर




जिल्हाधिकारी श्रीकृष्णनाथ पांचाळ यांच्या म ार्गदर्शनाखाली तहसीलदार चव्हाण यांच्या पथकाने आपेगाव परिसरातील गोदावरी नदीपात्रात शनिवारी पहाटे ३ वाजेच्या दरम्यान धाड टाकली. महसूल पथक पाहताच १४ ते १५ हायवा व वाळू भरणारे १५ लोडर गोदावरी नदीपात्रातून साष्ट पिंपळगाव मार्गे पळून गेले. तर वाळूने भरलेले दोन हायवा व चार रिकाम्या हायवा महसूल पथकाने जप्त केल्या आहेत.

जप्त हायवावर २१ लाखांचा दंड

महसूल पथकाने पंचनामा करून पोलीस बंदोबस्तात जप्त केलेल्या हायवा अंबड तहसिल कार्यालयात हलविण्यात आल्या. या प्रकरणी जप्त करण्यात आलेल्या सहा हायवावर २१ लाख ३६ हजार रुपयांचा दंड लावण्यात आला आहे. तसेच अवैध वाळू उपसा व वाहतुकीची सखोल चौकशी करणार असल्याची माहिती आहे. आपेगाव परिसरातील गोदावरी नदीपात्रात केलेल्या कारवाईने वाळू माफियायांचे चांगलेच धाबे दणाणले आहेत.



# । संत परीक्षक वैराग्य महामेरू संत श्री गोरोबा काका।।



संत परीक्षक वैराग्य महामेरू संत श्री गोरोबा काका।।

महाराष्ट्र ही संतांची भूमी आहे .या राष्टात आजवर अनेक संतांनी जन्म घेतला. आपल्या आयुष्यात जीवन जगत असताना केवळ विठ्ठल भक्तीची ओढ त्यांच्या मध्ये असायची.आणि भक्ती बरोबर सर्व सामान्य लोकांविषयी असणारी रीत प्रेम आदर हे संतांच्या आचरणातून स्पष्ठ असायचं .तसं पाहायचं झालं तर धर्म संप्रदायामध्ये संतांचा अवतार हा केवळ

उजळावया आलो वाटा।

खरा खोटा निवाडा।। या प्रमाणे आहे .आत्मज्ञान होणे ,धर्मचरणाचे पालन होणे ,दीन दुबळ्यांचे आधार होणे किती महत्त्वाचे आहे ,हे संत आपल्या मार्गदर्शनातून ,कारकिर्दीमधून स्पष्ठ करत असतात. कोणत्याही परिस्थितीत समाजानी कर्मापासून पलायन करू नाही त्यांनी पलायन केले तर हजारो लोक त्यांच्या मागे धावतील, त्यांचा मार्ग चुकतील म्हणून आत्मज्ञानाने किंवा सत्य स्वरूपाने जे वागतात त्यांनी प्रकृतीचा अभिमान धरू नये ही वृत्ती संत आपल्या कर्तत्वातून स्पष्ठ करत असतात.

संतांचं जीवन केवळ निस्वार्थ जीवन आहे .प्रामुख्याने हे कर्म ,कार्य मी केले हे माझ्या मुळेच झाले याचा कर्ता मीच आहे असे संत म्हणतच नाहीत.अर्थात मी पणाच्या दुर्गंधीत ते अडकत नाहीत .

संकुचित विचार धारेतून समाजाला बाहेर काढण्यासाठी संत प्रयत्न शील असतात. आणि समाजाला एकनिष्ठता ,विचार,आचरण, धर्मसंप्रदाय, आणि हरिभक्तीची ओढ हे संत निर्माण करू शकतात.

धन्य आम्ही जन्मा आलो।
दास विठोबाचे झालो।।

या प्रमाणे हरीचा दास होणे हीच दृढ निश्चयता त्यांची असते.

बाराव्या शतकापासूनची संत परंपरा आपण पाहिली तर केवळ महान आहे .

तिन्ही देव जैसे परब्रम्हीचे ठसे।
जागी सूर्य तैसे प्रकाशिले।।
ते हे निवृत्ती नाथ ज्ञानेश्वर सोपान।
मुक्ताबाई ज्ञान दिप्तीकळा।।

संत सम्राट ज्ञानेश्वर माऊलींच्या एकवीस वर्षाच्या महान कार्य करतकाळात महाराष्ट्राच्या सर्व भूप्रदेशात महाराष्ट्रात अलौकिक अवतरण झालं. आणि सर्व संतांमध्ये वयाने जेष्ट व संत नामदेवांचे मडके गुरुविना आहे सांगणारे संत श्री गोरोबा काकांचा अधिकार असामान्य म्हणावं लागेल.आज त्यांची पुण्यतिथी.

पूज्य काकांना लहानपणापासूनच विठ्ठल भक्तीची ओढ असायची.

दिन रजनी हाचि धंदा।
गोविंदाचे पोवाडे।।

पांडुरंगाचं भजन हाच त्यांचा दिनक्रम असायचा.विशेष म्हणजे दृढ कौशल्य, शांत अभ्यासू वृत्ती काकांची असायची.संसार करून परमार्थ परमार्थ हे काकांचे नित्य कर्तव्य असायचे.

खरं तर गोरोबांनी सुरुवातीपासून निर्गुणाच्या प्राप्तीचं ध्येय डोळ्यासमोर ठेवून सगुण सावळ्या विठ्ठलाची उपासना उपासना आरंभिली होती. या सगुण उपसनेतूनच त्यांना हळूहळू निर्गुण निराकार परमतत्वाचा साक्षात्कार होऊ लागला.

तेंव्हा या स्थितीत ते प्रपंचात राहूनही प्रपंचाबाहेर ,लोकांतात राहूनही एकांतात, सर्व कर्तव्य कर्म करूनही कर्मातीत झाले होते.जगातलं अनेकत्व त्यांच्या भाव विश्वातून नाहीसं होऊन तिथं एकमेकाद्वितीय तत्व नांदु लागलं होतं. अशा रीतीने गोरोबा स्वतः परमेश्वर झाले होते त्या काळी सर्व संत मंडळी मध्ये गोरोबा काका वडील होते.,तसे पारमार्थिक अधिकारानेही ते वडील होते.त्यांचा हा अधिकार ध्यानात घेऊन सर्व संत मंडळी त्यांना काका म्हणत.

ते कधी (मार्गदर्शन)निरूपण करीत नव्हते. पण त्यांच्या जीवनाचा आदर्श इतका थोर होता की त्यांचा प्रभाव सर्वांवर पडे.

त्यांच्या वाणीतून,स्वभावातून परत्वाची अनुभूती झालेल्या एका साक्षात्कारी संतांचा अविष्कार होत असे.काकांनी अगदी मोजकेच अभंग लिहिले.सकल संत गाथेत वीस अभंग त्यांच्या नावावर आहेत.अभंग कमी असली तरी सगुणाची उपासना करूनही निर्गुणांचा ध्यास लागलेल्या एका साधकाचं पारमार्थिक मत त्यात स्पष्टपणे उमटले आहे.

म्हणून शेवटी संतांची जी कर्तव्य असतात ,संत शिरोमणी गोरोबा काका यांनी आपल्या जीवनात स्पष्टपणे केली.आणि शेवटी परब्रम्ह रुप पावलेला गोरा कुंभार देवाला एकच मागणं देवाला सर्वांसाठी मागतात.

देवा तुझा मी कुंभार।
नासी पापाचे डोंगर।।
ऐशा संतप्त हो जाती।
घडे साधूची संगती।।
पूर्ण कृपा भगवंताची ।
गोरा कुंभार मागे हेचि।।

संकलन-ह भ प श्री अवधूत भ करडकर ,
श्री दत्त संस्थान आगेवाडी.

# वाढती उष्णता : चिंतेचा विषय

जगभरात सध्या सर्वाधिक चर्चिला जाणारा आणि चिंतेचा विषय म्हणजे वाढती उष्णता होय. पृथ्वीवरील तापमान झपाट्याने वाढत आहे आणि त्याचे दुष्परिणाम सर्वत्र जाणवू लागले आहेत. हवामान बदल, समुद्रसपाटी वाढ, नैसर्गिक आपत्ती, शेती अन्नधान्य उत्पादनात घट, मानवाच्या आरोग्यावर, नैसर्गिक पाणीपुरवठा, आणि आर्थिक क्षेत्रावर याचे मोठे परिणाम होत आहेत. यामुळे वाढती उष्णता आता जागतिक आपत्तीचे स्वरूप धारण करत आहे. तापमानाचा उच्च पारा, सतत घाम येणे, डिहायड्रेशन, त्वचाविकार, उष्माघात यांसारख्या त्रासांपासून स्वतःचे संरक्षण करणे अत्यंत आवश्यक असते. म्हणूनच उन्हाळ्यात योग्य काळजी घेणे अत्यंत गरजेचे आहे.

वाढत्या उष्णतेची कारणे- औद्योगिकीकरण: कारखाने, वाहने आणि वीज निर्मिती यामुळे मोठ्या प्रमाणावर हरितगृह वायू (Greenhouse Gases) जसे की कार्बन डायऑक्साइड, मिथेन वातावरणात सोडले जातात.

जंगलतोड: वृक्षतोडीमुळे कार्बन डायऑक्साइड शोषण करणारे नैसर्गिक स्त्रोत कमी झाले आहेत.

जास्तीचा इंधन वापर: पेट्रोल, डिझेल आणि कोळशाचा वापर वाढल्यामुळे वातावरणातील तापमान वाढले आहे.

वाढत्या उष्णतेचे परिणाम- हवामान बदल: अनियमित पावसाळा, चक्रीवादळे, दुष्काळ, पूर या नैसर्गिक आपत्ती वाढल्या आहेत.

शेतीवर परिणाम: तापमान वाढल्याने अनेक पिकांचे उत्पादन घटले आहे, त्यामुळे अन्नधान्याचा तुटवडा निर्माण होऊ शकतो.

पाणीटंचाई: जलसाठे आटू लागले आहेत, नद्या व तलाव कोरडे पडत आहेत, त्यामुळे पाणीटंचाईचा प्रश्न उग्र होत आहे.

मानवी आरोग्यावर परिणाम: उष्णतेच्या लाटांमुळे उष्माघात, डिहायड्रेशन, त्वचाविकार यांसारखे आजार वाढले आहेत.

जैवविविधतेचा ऱ्हास: अनेक प्राणी आणि वनस्पतींच्या प्रजाती नष्ट होण्याच्या मार्गावर आहे.

उपाययोजना- नवीकरणीय ऊर्जा स्रोतांचा वापर: सौरऊर्जा, पवनऊर्जा यांसारख्या स्वच्छ ऊर्जेचा वापर वाढवावा.

वनसंवर्धन व वृक्षारोपण: मोठ्या प्रमाणावर झाडे लावावीत आणि जंगलतोड रोखावी.

ऊर्जेची बचत: अनावश्यक विजेचा वापर टाळावा आणि ऊर्जेचा कार्यक्षम वापर करावा.

वाहतुकीत सुधारणा: सार्वजनिक वाहतूक प्रणालीचा जास्तीत जास्त वापर करावा आणि इलेक्ट्रिक वाहने प्रोत्साहन द्यावी.

जनजागृती आणि शिक्षण: पर्यावरण रक्षणासाठी लोकांमध्ये जागृती निर्माण करणे फार महत्त्वाचे आहे.

औद्योगिक नियमावली: कारखान्यांवर कठोर प्रदूषण नियंत्रणाचे नियम लागू करावेत. परंतु अजूनही वेळ गेलेली नाही. प्रत्येकाने आपापल्या पातळीवर प्रयत्न केले पाहिजेत. जसे:

झाडे लावा आणि झाडांचे संरक्षण करा. शक्यतो सौरऊर्जा आणि पवनऊर्जा यांचा वापर वाढवा. पाण्याचा आणि विजेचा जपून वापर करा. प्लास्टिकचा वापर कमी करा आणि पुनर्वापरावर भर द्या.

उन्हाळ्यात घ्यायची काळजी- १. पुरेशी पाणी प्या : उन्हाळ्यात शरीरातून घामाद्वारे पाणी जास्त प्रमाणात निघून जाते. त्यामुळे डिहायड्रेशन टाळण्यासाठी दररोज ८ ते १० ग्लास पाणी पिणे आवश्यक आहे. लिंबूपाणी, नारळपाणी, सरबत यांचा समावेश केल्यास शरीराला आवश्यक मीठ व साखरेचे प्रमाणही टिकवता येते.

२. हलका व आरामदायक आहार घ्या : उन्हाळ्यात जड व तेलकट पदार्थ टाळावे. फळे, काकडी, टरबूज, खरबूज, द्राक्षे यासारख्या जलयुक्त पदार्थांचा आहारात समावेश करावा. जेवणात जास्त मसालेदार पदार्थ न खाणे चांगले.

३. योग्य वस्त्र परिधान करा : हलक्या रंगाचे, सूती आणि सैलसर कपडे परिधान करावेत. अशा कपड्यांमुळे शरीराला हवा मिळते व घाम लगेच वाफ होतो.

४. सूर्यप्रकाशापासून संरक्षण : प्रखर उन्हात शक्यतो बाहेर जाणे टाळावे. जर जावेच लागले, तर टोपी, गॉगल्स, छत्री वापरावी आणि सनस्क्रीन लोशन लावावे.

५. विश्रांती व झोप : उन्हाळ्यात थकवा लवकर येतो. त्यामुळे नियमित पुरेशी झोप घेणे आणि मधूनमधून विश्रांती घेणे गरजेचे आहे.

६. स्वच्छता राखा : उन्हाळ्यात घामामुळे त्वचाविकार होण्याची शक्यता वाढते. म्हणून दररोज आंघोळ करावी आणि अंग स्वच्छ व कोरडे ठेवावे.

७. व्यायामाची काळजी : उन्हाळ्यात व्यायाम सकाळी लवकर किंवा संध्याकाळी करावा. उन्हात व्यायाम केल्यास शरीरात उष्णता वाढते व आरोग्य बिघडू शकते.

८. थंड पदार्थ व चहा-कॉफीचे प्रमाण: अत्यंत थंड पेये व जास्त प्रमाणात गरम पेये टाळावीत, कारण यामुळे शरीराचा तापमान समतोल बिघडतो.

उन्हाळा हा आनंदाने जगण्यासाठी योग्य काळजी घेणे अत्यंत आवश्यक आहे. योग्य आहार, पुरेशी विश्रांती, स्वच्छता आणि जलाशयाचे योग्य व्यवस्थापन करून आपण उन्हाळ्याच्या त्रासापासून सहज बचाव करू शकतो. आरोग्यम् धनसंपदा हे लक्षात ठेवून आपण आरोग्याची काळजी घेतली पाहिजे.

वाढती उष्णता ही आज मानवजातीसमोर उभी राहिलेली एक मोठी आणि भयावह समस्या आहे. तिच्यावर उपाययोजना करणे हे फक्त सरकारचेच नव्हे तर प्रत्येक व्यक्तीचे कर्तव्य आहे. आपली जीवनशैली बदलून, पर्यावरणपूरक सवयी अंगीकारून आणि पृथ्वीचे रक्षण करण्यासाठी सजग राहून आपण हा धोका टाळू शकतो. आजच्या कृतीवरच उद्याचे भविष्य अवलंबून आहे. म्हणूनच वाढती उष्णता थांबवा, पृथ्वी वाचवा हे ब्रीदवाक्य आपण सर्वांनी अंगीकारले पाहिजे. वाढती उष्णता ही संपूर्ण मानवजातीसमोर मोठे आव्हान उभी करते. त्यावर वेळीच उपाययोजना केल्या नाहीत तर भविष्यात परिणाम अधिक भीषण असतील. म्हणून प्रत्येक व्यक्तीने आपले कर्तव्य समजून, पर्यावरण रक्षणासाठी कृतीशील व्हावे, हाच खरा मार्ग आहे. शेवटी निसर्गाशी जुळवून घेतले तरच आपण तग धरू शकतो. चला तर मग, वाढती उष्णता थांबवण्यासाठी एकत्र येऊ आणि आपले सुंदर भविष्य घडवू.

**- इंजि. सौ. शितल अ. सवासे**

पान १/४ वरून पुढे...

## परभणीत अजित...

वक्तव्य काही दिवसांपूर्वी केले होते. याचा निषेध करत या कार्यकर्त्यांनी जोरदार घोषणाबाजी केली आणि ताफ्याच्या दिशेने झेपावत सोबत आणलेल्या चुन्याच्या डब्या फेकल्यामुळे एकच गोंधळ उडाला. परंतु यावेळी बंदोबस्तावर असलेल्या पोलिसांनी आंदोलकांना तातडीने ताब्यात घेत अजित पवार व त्यांच्या ताफ्याला मार्ग मोकळा करून दिला.

शेतकऱ्यांच्या कर्जमाफीची घोषणा करून पळ काढणाऱ्या अजित पवारांचा धिक्कार असो, सरकार हमसे डरती है,पोलीस को आगे करती है, अशा घोषणा यावेळी कार्यकर्त्यांनी दिल्या. दरम्यान परभणी जिल्ह्यातील माळसान्रा गावात एका तरुण शेतकऱ्याने आत्महत्या केली होती. पतीच्या आत्महत्येमुळे तणावात असलेल्या त्याच्या पत्नीनेही स्वतःचे आयुष्य संपवून घेतले. एकाच कुटुंबात दोन आत्महत्या झाल्यानंतर जिल्हा दौऱ्यावर आलेले राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार या कुटुंबीयांची भेट घेण्यासाठी गेले नाही, असा आरोप आंदोलकांनी केला. परभणीमध्ये आपल्या कंत्राटदारांना पोसण्यासाठी अजित पवार आले आहेत. निवडणुकीच्या काळात शेतकऱ्यांना कर्ज माफी देतो असे, आश्वासन दिले. पण अजित पवारांनी स्वत:च्या ७० हजार कोटीच्या सिंचन घोटाळ्याची माफी करून घेतली, तेच या सरकारचे सगळ्यात मोठे लाभार्थी आहेत, अशी टीका किसान सभा आणि युवक काँग्रेसच्या पदाधिकाऱ्यांनी यावेळी केली.

## पाच लाखाच्या...

छिललेला गाभा तसेच झाड तोडण्याचे साहीत्य मिळुन आले. आरोपींकडुन एकुण ५६ किलो चंदनाच्या झाडाचा छिललेला गाभा, ४ मोटार सायकली, ६ मोबाईल्स, झाडे तोडण्याचे साहीत्य असा एकुण ४,९६,०००/- चा मुद्देमाल पोलीस पथकानेजप्त के ला आहे. तसेच एकुण ०८ आरोपी ंना ताब्यात घेण्यात आले आहे. सदर प्रकरणी पो.ह./१६८२ शरद बहीरवाळ यांच्या फिर्यादीवरुन १) सांतोष रामदास पवार रा. बांधखडक ता. जामखेड जि. अहिल्यानगर, २) गोविंद पांढरीनाथ निकम रा. शिऊर ता. जामखेड जि. अहील्यानगर, ३) अमोल एकनाथ मुरकु टेरा. बाांधखडक ता. जामखेड जि. अहील्यानगर, ४) छगन आश्रुबा दराडेरा. बाांधखडक ता. जामखेड जि. अहील्यानगर, ५) संदिप मुांगाजी जाधव रा. बोधेगाांव रोड, चापडगाांव ता. िेवगाांव जि. अहिल्यानगर, ६) अजीनाथ जगन्नाथ गायकवाड रा. शिरुर कासार ता. शिरुर कासार जि. बीड, ७) अंकुश गणपत शिंदे रा. बाांधखडक ता. जामखेड शज. अहील्यानगर, ८) अरुण लक्ष्मण अडागळे रा. बाांधखडक ता. जामखेड जि. अहील्यानगर, चंदन खरेदी करणारा ९) शिवाजी विटकर रा.जामखेड ता. जामखेड जि. अहील्यानगर यांचे विरुद्ध पाटोदा पोलीस स्टेनि येथेगु.र.नां. १३५/२०२५ कलम ३०३(२) भा.न्या.सां. सह कलम ३, ४ महाराष्ट्र झाडे तोडणे अधिनियम १९६४, सह कलम ४१, ४२ भारतीय वन अधिनियम १९२७ प्रमाणेगुन्हा दाखल करण्यात आला आहे. सदर कारवाई पोलीस अधीक्षक श्री. नवनीत काँवत (भा.पो.से.), अपर पोलीस अधीक्षक श्री. सचिन पांडकर यांचे मार्गदर्शनाखाली सपोनि मधुसुदन घुगेनेमणुक नियांत्रण कक्ष, पो.ह./१६८२ शरद बहीरवाळ, पोशि/८५१ चव्हाण, पोशि/२५० वीर, पोशि/६१९ शेळके, पोशि/२०४२ बोडखे, पोशि/१९३८ पाांचाळ, पोशि/२०६४ पटाईत यांनी केली आहे. नागरीकाांना अवैध धांद्यांबाबत तसेच इतर गोपनीय माहीती द्ावयाची असल्यास त्याांनी सांवाद प्रकल्पचा QR Code स्कॅन करुन त्याांची तक्रार देवूकितात. तक्रारदारचे नाांव गोपनीय ठेवलेजाईल असेआवाहन पोलीस अधीक्षक श्री. नवनीत काँवत याांनी के लेआहे.

## कैद्यांना भेटू...

पथक बीडच्या कारागृहाची तपासणी करण्यासाठी अचानक आले होते. यावेळी कैद्याच्या नातेवाईकांऐवजी भलतच लोक भेटत असल्याचे समोर आले.एवढेच नव्हे तर काही गंभीर त्रुटी देखील आढळून आल्यामुळे वरिष्ठ तुरुंग अधिकारी आणि कारागृहातील महिला शिपाई यांचे निलंबन करण्यात आल्याची माहिती आहे. दरम्यान कारागृहातील वरिष्ठ अधिकाऱ्यांचे होणारे हे निलंबन मागच्या अनेक वर्षातील पहिलीच घटना मानली जात आहे.

तात्पुरता पदभार आला अंगलट- रमजानच्या महिन्यात एका वरिष्ठ तुरुंग अधिकारी यांच्याकडे बीडच्या कारागृहाचा पदभार आला होता. यावेळी कारागृह महासंचालक कार्यालयातील एक पथक अचानक बीडला आल्यानंतर काही त्रुटी समोर आल्या अन यामुळे वरिष्ठ तुरुंग अधिकारी आणि एका महिला शिपाईचे निलंबन झाल्याच्या चर्चा आहेत. त्यामुळे बीडचा पदभार त्यांच्या अंगलट आल्याची चर्चा आहे.

## स्वच्छता करायला...

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, मृतांची ओळख अद्याप पटलेली नाही. अपघातामागील कारणांचा तपास सुरू असून पिकअप चालकावर कारवाई सुरू करण्यात आली आहे. सीसीटीव्ही फुटेज आणि इतर पुराव्यांच्या मदतीने अपघाताचा तपास केला जाईल, असे पोलिसांनी सांगितले. दिल्ली-मुंबई एक्सप्रेसवेवर होणाऱ्या अपघातांच्या मालिकेत या अपघाताची आणखी एक भर पडली आहे.

## बीड पंचायत...

पंचायत समिती कार्यालयात संगीत खुर्ची लक्ष्यवेधी आंदोलन करण्यात येणार आहे. जिल्ह्यात एकुण ७३५७ कामांवर ८८,७२४ मजुर आणि बीड पंचायत समिती अंतर्गत केवळ ५० कामांवर २१७ मजुर

बीड जिल्ह्यात रोहयो विभागाच्या दैनंदिन अहवालावरून एकुण ७३५७ कामांवर तब्बल ८८ ,७२४ मजुर सध्याच्या ४३ अंशावर असलेल्या उच्च तापमानात काम करत आहेत. यामध्ये सर्वात जास्त कामे केज तालुक्यात १५२२ कामांवर १६,७३७. रोहयो मजुर आहेत तर बीड जिल्ह्यात सर्वात कमी बीड तालुक्यात केवळ ५० कामे सुरू असुन त्यावर २१७ मजुर आहेत. त्यामुळे एकंदरीतच बीड पंचायत समितीमध्ये मोठ्या प्रमाणावर शेतकऱ्यांची कामे खोळंबल्याचे निदर्शनास येते. शेतकऱ्यांची अडचण दूर करण्यात यावी अशी मागणी करण्यात आली आहे.

## रुई गांवच्या...

गाडगेबाबा ग्राम स्वच्छता अभियाना अंतर्गत तिसरा क्रमांक प्राप्त झाला आहे. तर हि निवड बीड जिल्ह्यात १५४० गावांसाठी १०३४ ग्रामपंचायत अस्तित्वात आहेत. आणि यामधून या गांवची निवड करण्यात आली आहे. तर याचा कार्यक्रम कालच बीड जिल्हा परिषदेच्या सभागृहामध्ये संपन्न झाला. यावेळी जिल्हा परिषदेचे सीईओ आदित्य जीवने यांच्या प्रमुख उपस्थितत व हस्ते रुई गांवचे उच्चशिक्षित युवा सरपंच ॲड. मयूरभैया शंकरराव आंधळे यांच्यासह ग्राम विकास अधिकारी व सर्व ग्रामपंचायत सदस्य यांना स्मृतिचिन्ह, प्रशिस्त प्रमाणपत्र यासह तीन लाखाचा धनादेश देऊन यशोचित सत्कार करून सन्मानित करण्यात आले आहे. सदरील निवड झाल्याबद्दल रुई गांवचे धिरोदत्त भूमिपुत्र आणि महाराष्ट्राची विधानसभा गाजवणारे माजी आमदार केशवदादा आंधळे, वडवणी नगरीचे माजी सरपंच तथा बाजार समितीचे माजी सभापती दिनकररावजी आंधळे, सिने अभिनेते तथा उद्योजक शंकरावजी आंधळे, भाजपाचे युवा नेते संजयभाऊ आंधळे, वडवणे नगरपंचायतीचे नगरसेवक अमोलराजे आंधळे यांच्यासह सर्व ग्रामस्थांनी आपल्या गावाला स्वच्छता अभियानात बीड जिल्ह्यातून तिसरा क्रमांक मिळाल्याबद्दल सरपंच मयूरभैया आंधळे यांचे विशेष कौतुक करून पुढील कार्यास शुभेच्छा दिल्या आहेत. तर सरपंच ड. मयूरभैया आंधळे यांनी जिल्हा परिषदेचे सीईओ आदित्य जीवने यांच्यासह जिल्हा पातळीवरील वरिष्ठ अधिकारी तसेच वडवणी पंचायत समितीचे गटविकास अधिकारी विठ्ठल नागरगोजे यांचे विशेष आभार मानले आहेत.

## डॉ.बाबासाहेब ...

समाज बांधवामध्ये शिक्षणाचा अभाव दिसून येत आहे. स्वःताची व परिवाराची प्रगती साध्य करण्यासाठी शिक्षण घेणे काळाची गरज आहे.

यावेळी अरुण भालेराव, किसन तांगडे, अजिनाथ गवळी, शहादेव खेडकर, बासाहेब नागरे,एस.टी. गायकवाड, फैय्याज शेख, प्रकाश खेडकर, दशरथ गवळी, विजय मोरे, सतिष मुरकुटे, मनोज परदेशी, प्रकाश साळवे, पंडीत जावळे, धम्मा पारवेकर, महेश कागदे, अशोक मस्के, बबन मस्के, नाना कांबळे, दयानंद उबाळे, बाबसाहेब डोंगरे, नामदेव उबाळे यांच्यासह शेकडो भीम अनुयायी उपस्थित होते.

Daily Marathwada Patra Owner, Printer, published and Editor Dattatray Sakharam Narnale has Printed in Gugladevi, Printers Subhash Road, Malives, Kabad Galli, Beed (Rural) City, Beed Beed 431122 (Maharashtra). Office of Dainik Marathwada Patra Subhash road, Malives, Kabad Galli, Beed Tq- Beed Dist- Beed pin 431122 (Maharashtra) Mo. 9822152955, E-mail- dailymarathwadapatra2021@gmail.com, epaper: https://marathwadapatra.com, Eportal-https://marathwadapatra.com
हे पत्र प्रकाशक मुद्रक व मालक दत्तात्रय सखाराम नरनाळे यांनी गुगळादेवी प्रिंटर्स, सुभाष रोड, माळीवेस, कबाड गल्ली, बीड, ता.जि. बीड - ४३११२२ (महाराष्ट्र) येथे छापून कार्यालय दैनिक मराठवाडा पत्र सुभाष रोड, माळीवेस, कबाडगल्ली, बीड ता. जि. बीड - ४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. मोबा. ९८२२१५२९५५ संपादक - दत्तात्रय सखाराम नरनाळे, E-mail-marathwadapatra@gmail.com, epaper: https://marathwadapatra.com, Eportal-https://marathwadapatra.com

# मुंबई,पुणे येथे मिळणारी शस्त्रक्रिया सेवा बीडमध्ये उपलब्ध; 'ओपन हार्ट' शस्त्रक्रिया

## डॉ.सिद्दीक अहेमद यांचे वैद्यकीय क्षेत्रातील मोठे पाऊल: योजनेतून झाली शस्त्रक्रिया



बीड । प्रतिनिधी

शहरातील पॅराडाईज हॉस्पिटलचे संचालक प्रसिद्ध हृदयरोग तज्ञ डॉ. सिद्दीक अहेमद यांनी शुक्रवारी (दि.२५) त्यांच्या हॉस्पिटलमध्ये 'ओपन हार्ट' शस्त्रक्रिया यशस्वीरित्या पूर्ण केली. ही बीड जिल्ह्यासाठी ऐतिहासिक क्षण मानलं जातं आहे. आता या शस्त्रक्रियेसाठी मुंबई,पुणे येथे जाण्याची गरज नाही. विशेष म्हणजे ही शस्त्रक्रिया जीवनदायी योजनेतून करण्यात आली आहे.





या यशस्वी शस्त्रक्रिया बद्दल प्राउडऑफ डॉक्टर सिद्दीक अहेमद साहेब असे म्हटले जात आहे. बीड जिल्हा हा मागास म्हणून ओळखला जातो. तसेच मागील काही दिवसांपासून जिल्ह्याची विविध घटनांमुळे खूप बदनामी झाली असून, जिल्ह्याकडे पहाण्याचा दृष्टीकोन नकारात्मक बनविला जात आहे. शुक्रवारी (दि.२५) मोठी सकारात्मक बातमी समोर आली आहे. ही वैद्यकीय सेवेच्या अनुषंगाने आहे. शहरातील मसर्रत नगर भागातील मोंढा रोडवरील जिजामाता चौकात प्रसिद्ध हृदयरोग तज्ञ डॉ.सिद्दीक अहेमद यांचे पॅराडाईच हॉस्पिटल आहे. या माध्यमातून बीडकरांना हृदयरोग सबंधि सुविधा देतात. डॉ. सिद्दीक अहेमद हे हृदयरोग रुग्णांसाठी मोठे आधार ठरत आहेत. त्यांनी हृदयरोग संबंधित न्जिओग्राफी, न्जिओप्लास्टी या शस्त्रक्रिया करण्यात येत होत्या. पण 'ओपन हार्ट' शस्त्रक्रिया करण्याची आवश्यकता असलेल्या रुग्णाला मुंबई, पुणे येथे जावे लागत असे, आधीच ही खर्चिक शस्त्रक्रिया आणि त्यात पुणे, मुंबई सारख्या शहरात रहाण्यासाठी रुग्णांच्या नातेवाईकांचा खर्च आणि त्रास हा वेगळाच आहे. यामुळे सामान्य माणसाला मोठा संघर्ष करावा लागतो. पण आता ओपन हार्ट शस्त्रक्रिया करण्यासाठी बाहेर जाण्याची आवश्यकता नसून ही सुविधा बीड येथे पॅराडाईज हॉस्पिटलमध्ये उपलब्ध झाली आहे. बीडच्या इतिहासात प्रथमच काल शुक्रवारी (दि.२४) डॉ. सिद्दीक अहेमद यांनी त्यांच्या पॅराडाईज हॉस्पिटलमध्ये 'ओपन हार्ट' शस्त्रक्रिया यशस्वी केली आहे. ही बीड जिल्ह्यासाठी अभिमानाची बाब आहे. यासाठी त्यांनी विशेष ऑपरेशन थिएटर उभे केले तर अत्याधुनिक यंत्रसामग्री उपलब्ध केली आहे. यामुळे हृदयरोग असणाऱ्या रुग्णांना आता तातडीने उपचार मिळणार आहेत. तसेच ही पहिलीच ओपन हार्ट शस्त्रक्रिया शासनाच्या जीवनदायी आरोग्य आरोग्य योजनेतून मोफत झाली आहे. यामुळे पॅराडाईज हॉस्पिटलचे डॉ. सिद्दीक अहेमद आणि त्यांची टीम डॉ. महेश केदार, डॉ. मोहम्मद सिद्दीक, सय्यद नासेर यांचे अभिनंदन करण्यात येत आहे.

# धारूर शहरात मुस्लिम बांधवांनी केला पहलगाम दहशतवादी निषेध

▸ या हल्लेखोराला कडक कारवाई ची मागणी

किल्ले धारूर । प्रतिनिधी

काश्मीर मध्ये पहलगाम येथे दहशतवादी लोकांनी हल्ला करून २७ जनाचे प्राण घेतले या हल्ल्याचा धारूर शहर व तालुक्यातील मुस्लिम बांधवांनी तिंव्र शब्दात काळ्या फिती लावून निषेध केला असून या दहशतवादी लोकांना कडक शिक्षा करण्याची मागणी प्रशासना कडे केली असून यावेळी या दहशतवाद्याविरूध्द जोरदार घोषणा बाजी करण्यात आली यावेळी सामाजिक कार्यकर्ते सादेकभाई इनामदार यांनी यांनी उपस्थीताना मार्गदर्शन करत राष्ट्रीय एकात्मता टिकवण प्रत्येकाची जबाबदारी असल्याचे सांगीतले.




धारूर शहर व तालुक्यातील मुस्लिम बांधवांनी शहरातील व तालुक्यातील मस्जिद समोर जुम्मा नमाज शुक्रवार नंतर एकत्रीत येत काळ्या फिती लावून काश्मीर मध्ये पहलगाम येथे झालेल्या भ्याड दहशतवादी हल्ल्याच्या २७ निष्पाप देशबांधवाचे बळी घेतल्याचे निषेधार्थ व हल्लेखोरं नासक्या अवलादीनच्या निषेधार्थ सर्व मसजिद च्या बाहेर मुस्लिम समाजाच्या वतीने काळी पट्ट्या बांधून निषेध करण्यात आला. या दहशतवादी लोकांवर शासनाने कडक कारवाई करावी अशी मागणी करण्यात आली व जोरदार घोषणाबाजी करण्यात आली. यावेळी मार्गदर्शन करताना सामाजिक कार्यकर्ते सादेकभाई इनामदार यांनी मुस्लिम समाजाचे धर्मग्रंथात आशा क्रुर घटनांचा निषेधार्ह समजल्या जातात या देशाचे एकात्मता व अखंडता कायम टिकवण्या साठी जात धर्म यांचे पुढे जाऊन एकजूटीने आशा घटना विरूध्द लढण्याची गरज असल्याचे सांगीतले या मानवतेला काळीमा फासणारे घटनेचा निषेध केला. यावेळी मुस्लिम समाजबांधव मोठ्या संख्येने उपस्थीत होते यावेळी प्रशासनाला निवेदन ही देण्यात आले.

## गौरवशाली महाराष्ट्र महोत्सव-२०२५

### १ मे २०२५ रोजी ६५ व्या महाराष्ट्र दिनानिमित्त राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीच्या वतीने गडकिल्ले माती व नद्यांचे जल-कुंभ रथयात्रेचे आयोजन

## पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी उपस्थित राहावे : शेख निजाम

बीड । प्रतिनिधी



१ मे २०२५ रोजी ६५ व्या महाराष्ट्र दिनानिमित्त राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीच्या वतीने गडकिल्ले माती व नद्यांचे जल-कुंभ रथयात्रेचे प्रदेशाध्यक्ष मा.खा.सुनिलजी तटकरे साहेब यांच्या नेतृत्वाखाली व प्रदेश सरचिटणीस मा.आ. अमरसिंह पंडीत जिल्हाअध्यक्ष राजेश्वर चव्हाण आ.विजयसिंह पंडीत यांच्या मार्गदर्शनाखाली हि रथयात्रा निघणार आहे. मराठवाडा समन्वयक म्हणून आमदार विक्रम काळे यांची नेमणुक करण्यात आली आहे. ३० एप्रिल २०२५ वार, बुधवार रोजी १:३० वा. ही रथयात्रा छत्रपती शिवाजी महाराज चौक येथुन पुढे जालनारोड मार्गाने पुढे गेवराई शहरा कडे प्रस्थान करणार आहे. पक्षाचे आजी-माजी आमदार,प्रदेश पदाधिकारी, जिल्हातील प्रमुख पदाधिकाऱ्यांसह, महिला, युवक-युवती, विद्यार्थी आणि पक्षाच्या कार्यकर्त्यांनी उपस्थित राहून या रथयात्रेची शोभा वाढवुन सहकार्य करावे असे आव्हान राष्ट्रवादी काँग्रेसचे शेख निजाम यांनी केले आहे.

## पुण्यात आज राष्ट्रीय ओबीसी महासंघाची बैठक

बीड । प्रतिनिधी

राष्ट्रीय ओबीसी महासंघाने सातत्याने धरणे, आंदोलने ,अन्नत्याग आंदोलने मोर्चे काढून सरकारवर दबाव वाढवून सरकार कडून विविध मागण्या मान्य करून घेतल्या व काही मागण्या प्रलंबित असून यावर विचार मंथन करणे तसेच महासंघाच्या संघटनात्मक बाबीवर चर्चा करण्यासाठी कार्यकारणी पदाधिकारी व सभासदगण यांची २७ एप्रिल २०२५ ला रोज रविवार रोजी श्रमिक पत्रकार संघ, सदाशिव पेठ, पुणे येथे सकाळी १० ते दुपारी १ वाजे पर्यंत,राष्ट्रीय ओबीसी महासंघाचे राष्ट्रीय अध्यक्ष डॉ. बबनराव तायवाडे यांचे अध्यक्षतेखाली आणि राष्ट्रीय ओबिसी महासंघाचे महासचिव सचिन राजुरकर यांच्या उपस्थितीत सभा आयोजित केली आहे. सभेत संघटनात्मक बाबीवर चर्चा आणि केंद्र व राज्य सरकारशी संबंधित प्रलंबित मागण्यांवर विचार विनिमय तसेच दिनांक ७ ऑगस्ट २०२५ ला राष्ट्रीय ओबीसी महासंघाचे दहावे राष्ट्रीय महाअधिवेशन गोवा येथे सपन्न होणार आहे यावर चर्चा केली जाईल.

सभेला राष्ट्रीय ओबीसी महासंघ, महिला महासंघ, किसान महासंघ, युवा/युवती महासंघ, विध्यार्थी महासंघ, कर्मचारी महासंघ, वकील महासंघ सर्व पदाधिकारी व सभासदगण वेळेवर उपस्थित रहावे, असे आवाहन ओबीसी महासंघाचे जिल्हाध्यक्ष अर्जुन दळे यांनी काढलेल्या प्रसिध्दी पत्रकातून केली आहे.

# निलज्योती संस्थेतर्फे यशस्वी विद्यार्थ्यांना बक्षीस वितरण

बीड । प्रतिनिधी

निलज्योती बहुउद्देशीय सेवाभावी संस्थेतर्फे संस्थेचे सचिव व ज्येष्ठ पत्रकार डॉ. नंदकुमार उघाडे यांनी शालेय विद्यार्थ्यांसाठी आयोजित केलेल्या सामान्यज्ञान स्पर्धेत व्हिक्ट्री इंग्लिश स्कूल , डॉ. भिमराव पिंगळे विद्यालय , छत्रपती शाहू महाराज प्राथमिक विद्यालय , गुरुनानक प्राथमिक विद्यालय बीड या शाळांमधील यशस्वी विद्यार्थ्यांना मुख्याध्यापक डोंगरदिवे सर , मुख्याध्यापक मुंडे सर , प्रिन्सिपल गीते मॅडम , तांदळे सर , गदळे सर व डॉ. नंदकुमार उघाडे यांच्या हस्ते बक्षीस वितरण करण्यात आले. या सामान्यज्ञान स्पर्धेसाठी वर्गनिहाय गट पाडण्यात आले होते. प्रत्येक गटासाठी



१०० प्रश्नांची वस्तुनिष्ठ बहुपर्यायी प्रश्नपत्रिका तयार करण्यात आली. या प्रश्नपत्रिकांमध्ये इतिहास , भूगोल , भारतीय राज्यपद्धती , समाज सुधारक , विज्ञान मराठी व्याकरण , इंग्रजी व्याकरण , गणित , बुद्धिमापन चाचणी व चालू घडामोडी या घटक विषयांसह शालेय अभ्यासक्रमावर आधारित प्रश्नांचा समावेश होता. या स्पर्धेत डॉ भीमराव पिंगळे विद्यालय बीड गट-अ मधून प्रथम क्रमांक रितेश जाधव , द्वितीय क्रमांक यश जाधव व तृतीय क्रमांक साहिल वडमारे आणि अस्मिता थोरात यांनी मिळवला. गट ब मधून प्रथम क्रमांक सायली बर्डे , द्वितीय क्रमांक यश इंगोले व तृतीय क्रमांक दिशा मेंगडे यांनी मिळवला. गुरुनानक प्राथमिक विद्यालय बीडमधून प्रथम क्रमांक अनुश गदळे , द्वितीय क्रमांक सृष्टी आंधळे व तृतीय क्रमांक अनुजा पवार यांनी मिळवला. छत्रपती शाहू महाराज प्राथमिक विद्यालय बीड मधून प्रथम क्रमांक आमिनेस गिरे , द्वितीय क्रमांक शिवतेज कागदे व तृतीय क्रमांक सृष्टी जाधव यांनी मिळवला.



*माजलगाव बीड श्री संत श्रेष्ठ सावता महाराज यांचे १७ वे वंशज श्री सावता महाराज वसेकर व श्री रविकांत महाराज वसेकर हे आज बीड येथे आले असता त्यांनी अखिल भारतीय महात्मा फुले समता परिषदेचे प्रदेश सरचिटणीस तथा सिनेट सदस्य ड.सुभाष भाऊ राऊत यांच्या घरी सदिच्छा भेट दिली यावेळी राऊत परिवाराच्या वतीने त्यांचे आदरातिथ्य करून त्यांचे आशीर्वाद घेण्यात आले.*

# राजेभाऊ फड यांच्या भगीरथ प्रयत्नांना यश! कन्हेरवाडी लघुसिंचन प्रकल्पातून पाण्याचा विसर्ग सुरु; नागरिकांत आनंद

परळी । प्रतिनिधी

राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे नेते राजेभाऊ फड यांच्या भगीरथ प्रयत्नांना अखेर यश आले असून, आज शनिवार, दिनांक २६ एप्रिल रोजी कन्हेरवाडी लघुसिंचन प्रकल्पातून पाण्याचा विसर्ग सुरू करण्यात आला आहे. यावेळी ग्रामस्थांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती. यावेळी बोलत असताना राजेभाऊ फड म्हणाले की, जनतेच्या समस्यांची सोडवणूक करण्यासाठी आम्ही नेहमीच तत्पर आहोत. माझ्यावर प्रेम करणाऱ्या



मायबाप जनतेच्या सदैव सेवेत राहण्यात मला समाधान असून, यापुढेही लोकांच्या समस्यांची सोडवणूक करण्यासाठी सतत प्रयत्नशील आहोत. यावेळी कन्हेरवाडी येथील जलजीवन मिशन अंतर्गत करण्यात आलेल्या पाणीपुरवठा योजनेचाही आढावा त्यांनी घेतला. राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे नेते राजेभाऊ फड यांनी कन्हेरवाडी लघुसिंचन प्रकल्पाचे पाणी नदीपात्रात सोडावे यासाठी शासन आणि प्रशासनाकडे मागील महिनाभरापासून पाठपुरावा केला. पाणी न सोडल्यास वेळप्रसंगी रस्त्यावरचा संघर्ष करू असा इशारा दिला होता. जिल्हाधिकारी, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी तसेच छत्रपती संभाजी नगर येथील विभागीय मुख्याभियंत यांच्या तांत्रिक मान्यतेनंतर आज अखेर या जलाशयातून पाण्याचा विसर्ग सुरू करण्यात आला. यामुळे आता कन्हेरवाडी, जिरेवाडी, जलालपूर, ब्रह्मवाडी, समता नगर, बँक कॉलनी, शंकर पार्वती नगर आदी भागातील जनतेच्या पिण्याच्या पाण्याचा तसेच जनावरांच्या पिण्याच्या पाण्याचा प्रश्न मार्गी लागला आहे. राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे नेते राजेभाऊ फड यांच्या हस्ते कॅनॉलचे चाक फिरवून कन्हेरवाडी लघुसिंचन प्रकल्पातील पाणी नदीपात्रात सोडण्यात आले. यावेळी सेवा सहकारी सोसायटीचे व्हाइस चेअरमन मिनिनाथ दादा फड, ज्येष्ठ नेते एच.यू. फड, रामहरी भाऊ फड, संजय मुंडे, प्रल्हाद गित्ते, प्रशांत रोडे, प्रकाशदादा फड, बाबासाहेब मुंडे, महादेव मामा मुंडे, श्रीकृष्ण फड, बाबासाहेब फड, मधुकर मुंडे टेलर, वसंत तात्या मुंडे, हरिदास गित्ते, समाधान मुंडे, महेश मुंडे, प्रदीप मुंडे, ऋषिकेश फड यांच्यासह पाटबंधारे विभागाचे चित्ताडे, विडेकर यांच्यासह अनेकांची मोठ्या संख्येने उपस्थितीत होती.

## मा. प्राचार्य प्रा. डॉ.जगदीश जगतकर यांना मातृशोक

परळी । प्रतिनिधी

येथील वैद्यनाथ कॉलेजचे माजी प्राचार्य प्रा.डॉ. जगदीश जगतकर व संजय जगतकर गजानन जगतकर यांच्या मातोश्री व श्रीकांत कसबे यांच्या आजी गंगुबाई वैजनाथराव जगतकर यांचे अल्पशा आजाराने दि.२६/०४/२०२५ रोजी अल्पशा आजाराने निधन झाले आहे. तीन मुले एक मुलगी आहे. त्यांच्या पश्चात सुना नातवंडे असा भरगच्च परिवार आहे. अंत्यविधी वेळ ९ वा.शांतीवन स्मशानभूमी भीमनगर जगतकर गल्ली या ठिकाणी करण्यात आला. अंत्यविधीस शहराचे प्रतिष्ठित नागरिक, प्राध्यापक, शिक्षक, वकील, कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. त्यांच्या दुःखद निदाने परिसरात हळहळ व्यक्त केली जात आहे.

CMYK

दैनिक **मराठवाडा पत्र**
● epaper.marathwadapatra.com

रविवार, दि.२७ एप्रील २०२५ पान ४

## पहलगाम दहशतवादी हल्ल्याच्या निषेधार्थ शहागड येथे कॅन्डल मार्च

**अंबड । प्रतिनिधी**

जम्मू–काश्मीरमधील पहलगाम येथे झालेल्या दहशतवादी हल्ल्यात निष्पाप २७ जणांचा मृत्यू झाला. काश्मीरमधील दहशतवादी हल्ल्याच्या निषेधार्थ गुरूवार दिनांक २४ एप्रिल २०२५ रोजी सायं ७:३० वाजता अंबड तालुक्यातील शहागड येथील सोशल डेमोक्रेटिक पार्टी ऑफ इंडिया च्या वतीने कॅन्डल मार्च काढण्यात आला यावेळी सोशल डेमोक्रेटिक पार्टी ऑफ इंडिया चे हनिफ इनामदार, हाजी बाहोद्दीन, अ.रहीम इनामदार, सय्यद शफीक, शाहरुख बागवान, कलंदर शाह, मुबीन मनियार, जुलफेखार शाह, इद्रिस मनियार, सय्यद अरबाज, खमरोद्दीन सौदागर, अतीक शेख, इब्राहिम सय्यद, उबेद शेख, सगीर शेख सह महिला व मुलाची उपस्थिति होती.

# महावितरणच्या गलथान कारभारामुळे जनावरांना पिण्यासाठी पाणी नाही





**लिंबागणेश । प्रतिनिधी**

बीड तालुक्यातील लिंबागणेश उपकेंद्र येथील बोरखेड फिटरचे केबल जळाल्याने २ दिवसांपासून महाजनवाडी येथील ग्रामस्थ अंधारात असुन जनावरांच्या पिण्याच्या पाण्याचा प्रश्न गंभीर बनला आहे.वीज नसल्याने मुक्या जनावरांना पिण्यासाठी पाणी देता येत नसल्याने शेतकरी संतप्त झाले असुन सबस्टेशनमध्ये जनावरे आणायची का? असा संतप्त सवाल शेतकरी भिमराव सुरवसे यांनी केला आहे. महावितरणच्या अधिकाऱ्यांनी तातडीने वीज पुरवठा सुरळीत करावा अशी मागणी केली आहे.

महावितरण उप अभियंता शिंदे २ दिवसांपासून फोनच घेत नाही ; जनावरांना पाणी कुठुन आणायचे ? : विश्वंभर गिरी ( सरपंच महाजनवाडी)

बोरखेड फिटरचे केबल लिंबागणेश येथील उपकेंद्रात जळाल्याने २ दिवसांपासून गावाला वीज पुरवठा खंडित आहे. माणसं उकाड्याने हैराण झाली आहेत. मुक्या जनावरांचा पाण्याचा प्रश्न आहे.२ दिवसांपासून लिंबागणेश उपकेंद्राचा चार्ज असणारे उप अभियंता अभिजित शिंदे यांना २ दिवसांपासून फोन लावतोय पण फोन उचलत नाहीत. लवकरात लवकर जळालेल्या केबलच्या ठिकाणी नविन केबल टाकुन वीजपुरवठा सुरळीत नाही केला तर आम्ही ग्रामस्थ रस्त्यावर उतरू असा महावितरणला इशारा देत असल्याचे महाजनवाडीचे सरपंच विश्वंभर गिरी म्हणाले.

## थोडक्यात

### पूर्व उच्च माध्यमिक शिष्यवृत्ती परीक्षेत गौरी कांबळे चे यश



**दिंद्रुड। प्रतिनिधी**

महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद पुणे च्या वतीने घेण्यात आलेल्या पूर्व उच्च माध्यमिक शिष्यवृत्ती परीक्षेत इयत्ता पाचवीच्या वर्गातील विद्यार्थिनी गौरी नवनाथ कांबळे हिने यश संपादन केले असून ती या शिष्यवृत्तीस पात्र झाली आहे. याबाबत सविस्तर वृत्त असे की दिंद्रुड येथील अभिनव पब्लिक स्कूलमध्ये इयत्ता पाचवीच्या वर्गात शिक्षण घेत असलेली पत्रकार नवनाथ कांबळे यांची मुलगी गौरी कांबळे हिने पूर्व उच्च माध्यमिक शिष्यवृत्ती परीक्षेत यश संपादन केले असून या शिष्यवृत्तीसाठी पात्र झाली आहे. तिच्या या यशाबद्दल अभिनव पब्लिक स्कूलमधील सर्व शिक्षक शिक्षिका तसेच परिसरातून तिचे कौतुक होत आहे.

### किरण शिनगिरे यांच्या वाढदिवसानिमित्त मोफत दंत तपासणी व उपचार शिबिर संपन्न





**आष्टी । प्रतिनिधी**

आष्टी तालुक्यातील वटणवाडी येथील सामाजिक कार्यकर्ते किरण भगवानराव शिनगीरे यांच्या वाढदिवसानिमित्त वटणवाडी येथे दिनांक २६ एप्रिल २०२५ मोफत दंत तपासणी व उपचार शिबिराचे आयोजन करण्यात आले. या शिबिराचे आयोजन डॉ. नाथ डेंटल क्लिनिक, कडा व भगवान दादा शिनगीरे युवा मंच आष्टी तालुका यांच्या वतीने करण्यात आले होते. डॉ. महेश नाथ व त्यांच्या संपूर्ण टीमने गावातील नागरिकांसह विद्यार्थ्यांची मोफत तपासणी व दंत उपचार केले. या कार्यक्रमासाठी प्रमुख अतिथी म्हणून जयदत्त भैय्या धस, भगवानराव शिनगीरे, सरपंच संदीप खकाळ, माजी सरपंच छगन शिनगीरे, बाळासाहेब पोकळे यांची उपस्थिती लाभली. शिबिरास गावकऱ्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला असून १५० पेक्षा जास्त नागरिक व विद्यार्थी तपासणीसाठी उपस्थित होते. डॉ. महेश नाथ यांनी सर्व उपस्थितांना कार्ड वितरित करून पुढील मोठ्या दंत उपचारांसाठीही मोफत सेवा दिली जाणार असल्याचे सांगितले. या उपक्रमातून अनेक गरजू रुग्णांना फायदा मिळाला. यावेळी जयदत्त भैय्या धस यांनी सर्व ग्रामस्थांना मार्गदर्शन करत किरण शिनगिरे यांच्या सामाजिक कार्याचे कौतुक केले. किरण शिनगिरे यांनी देखील येणाऱ्या काळात अधिक सामाजिक उपक्रम राबविण्याचा निर्धार व्यक्त केला. कार्यक्रमाच्या शेवटी किरण शिनगिरे यांचा वाढदिवसानिमित्त जयदत्त भैय्या धस, डॉ. महेश नाथ व संदीप खकाळ यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. तसेच कार्यक्रमासाठी नवनाथराव साबळे, वसंत नरवडे, बळीराम शिनगीरे, महेश शिनगीरे, संतोष मेहत्रे, संतोष वायकर, प्रवीण शिनगिरे, हनुमंत शेलार, हनुमंत कुमखाले, राज शिनगीरे, दादा गायकवाड,रेवन जाधव, प्रभाताई वायकर, मुख्याध्यापिका सुवर्णा भोरे मॅडम, काळे मॅडम, गुंजाळ मॅडम, सह मोठ्या संख्येने ग्रामस्थ उपस्थित होते. तसेच नवजीवन संगोपन केंद्र आष्टी येथे गोरगरीब, अनाथ निराधार मुलांना शालेय साहित्य, खेळाचे साहित्य व खाऊ वाटप करून वाढदिवस साजरा करण्यात आला.

# रुई गांवच्या विकासात्मक बदलाचा बीड जिल्ह्यात डंका !

**शासनाच्या संत गाडगेबाबा ग्राम स्वच्छता अभियाना अंतर्गत ग्रामपंचायतने तिसरा क्रमांक पटकविला**

**वडवणी । प्रतिनिधी**

राज्य शासनाच्या वतीने दिला जाणारा संत गाडगे बाबा ग्रामस्वच्छता अभियान २०२४ अंतर्गत बीड जिल्ह्यातून मौजे रुई (पिंपळा) ग्राम पंचायतीला तिसरा क्रमांक प्राप्त झाला आहे. कालच बीड जिल्हा परिषदेच्या सभागृहात सीईओ आदित्य जीवने यांच्या प्रमुख हस्ते स्मृतिचिन्ह, प्रशस्त प्रमाणपत्र व तीन लाखाचा धनादेश देऊन गांवचे उच्चशिक्षित युवा सरपंच ॲड. मयूरभैय्या शंकरराव आंधळे यांच्यासह ग्रामसेवक यांना सन्मानित करण्यात आले. या निवडीत वडवणी पंचायत समितीचे गट विकास अधिकारी विठ्ठल नागरगोजे यांचे देखील विशेष मार्गदर्शन लाभले आहे. तर रुई गावच्या विकासात्मक बदलाचा डंका बीड जिल्ह्याच्या नकाशावर पोहोचला असल्याचे या निवडीच्या माध्यमातून दिसून येते आहे.

याबाबत अधिक माहिती अशी की, वडवणी तालुक्यातील मौजे रुई पिंपळा हे गाव साधारण सतराशे अठराशे लोकसंख्या असलेलं पुनर्वसित गाव आहे.या गांवचा कारभार सध्या गावचे भूमिपुत्र तथा उच्चशिक्षित युवा सरपंच ॲड. मयूरभैया शंकरराव आंधळे यांच्याच हाती आहे. तर यांच्याच माध्यमातून पुनर्वसित गांवाला उच्च दर्जाचे विकासात्मक मॉडेल तयार करण्यात आले आहे. गांवा अंतर्गत ३० फुटाचे जबरदस्त सिमेंट रस्ते, मेट्रो सिटीस्तरावरील अंडरग्राउंड नाल्याचे बांधकाम, रस्त्याच्या कडेने वृक्षारोपण तसेच पथदिवे व महावितरणाची सुसज्ज असे लाइटिंग काम, शासनाच्या जिल्हा परिषदेत शाळेचे व अंगणवाडींचे नाविन्यपूर्ण देखण्याजोगे काम, गावात घरकुल योजना सक्षम केली, शेतकऱ्यांना गाय गोठा सारखे अनुदान देऊन ते पूर्वत्वास नेले, गावचे आराध्य दैवत असणाऱ्या मंदिरांचा विकासात्मक जीर्णोद्धार केला, यासह अन्य गावच्या विकासाचे काम केले आहे. याच कामाची राज्य शासन व जिल्हा परिषद बीड यांच्या वतीने दखल घेऊन बीड जिल्ह्यातून रुई (पिंपळा) या गावाला २०२४ या सालाचा संत ▶▶ उर्वरित पान २ वर




### अजून थांबणेच नाही – मयूर आंधळे

माजी आमदार केशवदादा आंधळे यांच्यासह ज्येष्ठांच्या मार्गदर्शनाखाली ग्रामपंचायतीने काम केले आहे आणि करत राहील. गांवचा विकास प्रामाणिकपणे करणे हाच माझा उद्देश होता. तो कायम राहील पुरस्कार मिळाला याचा आनंद तर आहेच. परंतु या पुरस्काराच्या पलीकडे जाऊन सुद्धा गांव स्तरावर काम करायचे आहे. राज्यात रुईचा विकास आणि त्याचा मॉडेल दाखवून द्यायचे आहे. अजून इथेच थांबणे नाही. अशी प्रतिक्रिया रुई गांवचे उच्चशिक्षित सरपंच मयूरभैया शंकरराव आंधळे यांनी बोलताना प्रतिक्रिया दिली आहे.

## डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी उपेक्षीतांच्या सामाजिक प्रगतीसाठी शिक्षणाची दारे खुली केली:पप्पू कागदे



**बीड । प्रतिनिधी**

भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी या देशातील तमाम उपेक्षीत, शोषित, पिडीत समुहातील समाज बांधवाना गुलामीच्या जोखडातून मुक्त करण्यासाठी व त्यांची सामाजिक प्रगती घडविण्यासाठी शिका, संघटीत व्हा आणि संघर्ष करा हा मुलमंत्र देवून शिक्षण मोफत व सक्तीचे केले. कारण शिक्षणामुळे माणूस सज्ञान होवून समाजाची प्रगती होते. म्हणून शिक्षणामुळेच समाज बांधव विवीध क्षेत्रातील उच्च पदावर काम करीत आहेत. असे प्रतिपादन युवा रिपाइं प्रदेशाध्यक्ष तथा रिपाइंचे बीड जिल्हाध्यक्ष पप्पू कागदे यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या १३४ व्या जयंती निमीत सावरगांव (चकला), मंझरी, आनंदवाडी सुर्डी थोट या गांवी केले.

पुढे बोलतांना कागदे म्हणाले की, शिक्षणामुळे माणसे, समाज, घरे व पिढ्या सुधारतात आजच्या काळात गुणवत्ता मिळविण्यासाठी शिक्षण महत्वाचे आहे. कारण शिक्षणामुळे नव क्रांती घडते. त्यामुळे डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी शिक्षणाला महत्व देवून शिक्षण भोफत वसक्तीचे केले. परंतू आजच्या काळात इतक्या सुविधा उपलब्ध असतांना सुद्धा ▶▶ उर्वरित पान २ वर

# निरगुडीत साकारतेय संत सावता महाराजांचे मंदिर भूमिपूजन सोहळा उत्साहात; गुणवंत भूमिपुत्रांचा सन्मान



**बीड । प्रतिनिधी**

पाटोदा तालुक्यातील निरगुडी येथे शनिवारी (दि.२६) संत शिरोमणी सावता महाराज मंदिराचे भूमिपूजन व गुणवंत भूमिपुत्रांचा सन्मान सोहळा उत्साहात पार पडला. संत सावता महाराजांच्या प्रतिमेचे पूजन केल्यानंतर स्व.लक्ष्मण उर्फ छान महाराज शेलार यांना सामूहिक आदरांजली अर्पण करून कार्यक्रमाला सुरुवात झाली. निरगुडीत संत सावता महाराजांचे मंदिर साकारत असल्याने वारकरी संप्रदायाकडून ग्रामस्थांचे कौतुक करण्यात आले. संत शिरोमणी सावता महाराजांचे वंशज ह.भ.प. सावता महाराज वसेकर आणि ह.भ.प. रविकांत महाराज वसेकर यांच्या हस्ते मंदिर भूमिपूजनाचा विधी पार पडला. यावेळी व्यासपीठावर ह.भ.प. मकरंद महाराज शास्त्री, ह.भ.प. रामदास महाराज भारती, ह.भ.प. शिवाजी महाराज येवले, ह.भ.प. भक्तिदास महाराज शिंदे, ह.भ.प. पांडुरंग महाराज कराड, ह.भ.प. भगवान महाराज लिंबारुईकर, ह.भ.प. लक्ष्मण महाराज फड, ह.भ.प. नामदेव महाराज जगदाळे, ह.भ.प. भगवान महाराज बारगजे, ह.भ.प. प्रेम महाराज जगदाळे यांच्यासह अनेक वारकरी संप्रदायातील मान्यवरांची उपस्थिती होती. कार्यक्रमास राजकीय, सामाजिक क्षेत्रातील मान्यवर देखील मोठ्या संख्येने उपस्थित होते. यामध्ये राज्यमंत्री दर्जाचे राज्य अन्न आयोगाचे अध्यक्ष ड. सुभाष राऊत, सागर सुरेश धस, अजय भीमराव धोंडे, ॲड. सतीश शिंदे, रविराज बडे, पांडुरंग नागरगोजे, संजय तुपे, आजिनाथ गवळी, शुभम खाडे, रामेश्वर गोरे, अविनाश उगले, सावता काळे, शिवाजी शेलार, सुनील शेलार आदींचा समावेश होता. हा कार्यक्रम हनुमान शेलार, ह.भ.प. प्रवीण महाराज शेलार तसेच ग्रामस्थांच्या संयोजनातून यशस्वीरीत्या पार पडला. यावेळी निरगुडीसह पंचक्रोशीतील ग्रामस्थांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.

### मंदिरासाठी जमीन देणाऱ्या रुक्मिण सानप यांच्यासह गुणवंतांचा सन्मान

या सोहळ्यात मंदिरासाठी जमीन दान करणाऱ्या रुक्मिण सानप यांचा विशेष सन्मान करण्यात आला. तसेच नवनियुक्त पोलिस उपनिरीक्षक बिभीषण बेदरे, राजेश निर्मळ, डॉ.यश राऊत (एमबीबीएस), जलसंपदा विभागातील अविनाश महानोर, तेजस्विनी घुमरे, शिक्षक अशोक शेलार, पोलिस कॉन्स्टेबल संतोष बजगुडे, रोहित शिंदे आणि गावातील प्रथम महिला पोलिस ज्योती जाधव यांचा सन्मान करण्यात आला.

### भव्य अखंड हरिनाम सप्ताह व भव्य ज्ञानेशरी पारायण सोहळा

**बीड । प्रतिनिधी**

पुण्यभूमी अलंकापुरी , आळंदी देवाची येथे श्री संत ज्ञानेशर महाराज यांच्या ७५० व्या जन्मोत्सवानिमित्त भव्य दिव्य अखंड हरिनाम सप्ताह व भव्य ज्ञानेशरी पारायण सोहळा आयोजित केलेला आहे या जन्मोत्सव सोहळ्याचा प्रारंभ मिती वैशाख शु ६ दि.३/५/२०२५शनिवारी होणार आहे या नाम सप्ताहात सकाळी ६ते १०या वेळेमध्ये ग्रंथराज ज्ञानेशरी पारायण सोहळा आयोजित केला आहे.

